संशोधन विभाग -

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था (विद्या परिषद) पुणे.

अंतर्गत

राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा -

२०२३ - २०२४

नवोपक्रमाचे शीर्षक - " शनिवार माझ्या आवडीचा..."

स्पर्धकाचे नाव -

श्री.भारत चिंतामणी बंडगर

विषय साधन व्यक्ती/ केंद्र समन्वयक

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका शिक्षण विभाग सांगली.

नवोपक्रमाची माहिती -

नाव - श्री.भारत चिंतामणी बंडगर

भ्रमणध्वनी - ९४२२७८५२६४,

कायमचा पत्ता - मु.पो.कर्नाळ, ता मिरज. जि.सांगली. पीनकोड - ४१६ ४१६

जन्मतारीख - ०१/०६/१९७६

शैक्षणिक अर्हता - बी.ए (अर्थशास्त्र, इतिहास)

एम.ए (इतिहास, समाजशास्त्र, शिक्षणशास्त्र)

बी.पी.एड (शा.शिक्षण, भूगोल)

एम.पी.एड (शा.शिक्षण) डी.एस.एम, एम.फील (शिक्षणशास्त्र)

पी.एच.डी (शिक्षणशास्त्र) अपिअर,

एकूण केलेल्या कामाचा अनुभव - १७ वर्षे,

नवोपक्रमाचे शीर्षक - " शनिवार माझ्या आवडीचा..."

श्री.भारत चिंतामणी बंडगर

विषय साधन व्यक्ती/ केंद्र समन्वयक

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका शिक्षण विभाग सांगली.

(१) नवोपक्रमाचे शीर्षक - "शनिवार माझ्या आवडीचा..."

(२) प्रस्तावना - शंभर टक्के मुले शाळेत आली पाहिजेत, ती शिकली पाहिजे, आणि ती शाळेत रमली पाहिजेत. यासाठी प्रत्येक शिक्षकाने तंत्रस्नेही व्हावे, म्हणून शासन तंत्रज्ञानाच्या अधिक सेवासवलती उपलब्ध करून देत आहे. शिक्षण हक्क कायद्याप्रमाणे आम्ही शिक्षण देऊ, पण खरे शिक्षण देण्याचे काम शिक्षकांचे आहे. उपक्रमातून गट पद्धतीने, स्वशिक्षा, ज्ञानरचनावाद या माध्यमातून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी हा उपक्रम आहे. राज्यात १०० टक्के मुले शिकली पाहिजेत. एकही विद्यार्थी शैक्षणिक अप्रगत राहणार नाही, यासाठी शिक्षकांचे योगदानही महत्त्वाचे ठरणार आहे. विद्यार्थी गळती रोखा, शिक्षणाचा हा प्रगत माहोल असाच सुरू राहिल्यास खासगी शाळांच्या तुलनेत जिल्हा परिषदेच्या शाळा, नपा व मनपाच्या शाळांची प्रगत होतील, शाळेतील विद्यार्थी गळती रोखण्यासह लोकसहभाग वाढवण्यासाठी शैक्षणिक आवड असलेली माणसे शोधून त्यांच्या मदतीने वार्ड, वाड्या, वस्ती व गाव शैक्षणिकदृष्ट्या प्रगत करण्याचे आवाहन झाले.

* आनंददायी शिक्षणाची गरज -

शिक्षण हा बालकांचा मूलभूत हक्क आहे. ज्याप्रमाणे अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टींची मानवाला नितांत गरज आहे, तशीच शिक्षण व आरोग्याची आहे. त्या अनुषंगाने अगदी तळागाळातील लोकांपर्यंत, मुलांपर्यंत शिक्षण पोहोचावे म्हणून शासन प्रयत्नशील आहे. म्हणूनच ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक मूल शाळेत यावे ते शिकावे, टिकावे यासाठी व त्याने किमान अध्ययन क्षमता प्राप्त कराव्यात यासाठी शासन विविध ते उपक्रमांच्या माध्यमातून ते साध्य करण्याचा प्रयत्न करत आहे.

आईनंतर पहिले गुरू शाळेतील शिक्षक असतात. शिक्षक जर बहुश्रुत, समृद्ध असतील तर मुलांचे शिक्षण आनंददायी होते, किंबहुना कोणताही माणूस बहुश्रुत असेल तर चारचौघात त्याच्या व्यक्तिमत्त्वाची छाप उमटते. त्याचा फायदा मुलांना शिक्षणात होऊ शकतो. शिक्षणातील विविध संदर्भ, बदलते प्रवाह, विविध टप्पे शिक्षणात होणारा बदल जाणून ते टिपण्यासाठी व्यक्तिमत्त्व प्रगल्भ असणे गरजेचे आहे. चौकटी बाहेर, चार भिंतीच्या बाहेर मुलांची जडणघडण होत असते. शिक्षण चाकोरीबध्द रित्या देता येणार नाही. 'बिन भिंतीची उघडी शाळा, लाखो इथले गुरू' या उक्तीप्रमाणे त्याला अनौपचारिक रित्या शिक्षण देणे काळाची गरज आहे.

'घरात आई आणि शाळेत बाई' या म्हणी नुसार बालकाने जरी चुकीचे वागले, बोलले तरी आई ज्या प्रमाणे मुलाची चूक समजून घेऊन त्याला प्रसंगी मृदू कठोर भाषेत योग्य-अयोग्य, चूक - बरोबर काय याची जाणीव करून देते. तसेच कार्य या आनंददायी शिक्षणातून सहजतेने

होणार आहे. शिक्षकांने शिक्षण आनंददायी होण्यासाठी मुलांची भाषा शिकणे आवश्यक आहे. जीवन जगणे व शिकणे यात जी दरी आहे ती कमी होण्यास आनंददायी शिक्षण मदत करणार आहे. शिक्षणामुळे आत्मविश्वास निर्माण होईल. या शिक्षणामुळे मनावरचे दडपण, दहशत, भिडस्त स्वभाव कमी होईल, मूल शाळेत येईल, मुले आपल्या भाषेत व्यक्त होतात. त्यांची भाषा नाकारले की त्यांची संस्कृती, परंपरा नाकारतो, असे वाटून ती शिक्षण प्रवाहातून दूर जाऊ लागतील. त्यांच्या भाषेत बोलले की त्यांना हा आपल्या जातीतील, मातीतील, रक्तातील माणूस आहे त्याचा लळा लागला शिवाय राहणार नाही.

आनंददायी शिक्षणाने मुलाला उत्साही वातावरण द्यावे, मुल आनंदाने यावे, शिकावे, टिकावे त्याची उत्सुकता, जिज्ञासा फुलवणारे शिक्षण द्यावे. आनंददायी द्यावे, मुल आनंदाने यावे, शिकावे, टिकावे त्याची उत्सुकता, जिज्ञासा फुलवणारे शिक्षण द्यावे. आनंददायी शिक्षणातुन मुल पाठ्यपुस्तक या साधनांच्या माध्यमातून जीवनाचे साध्य काय आहे वयपरत्वे शिकेल. आनंददायी शिक्षणामुळे शेती, नफा तोटा, गणित, शेतकऱ्यांचे जगणे, कष्टकऱ्या विषयी आदर, सन्मान वाटला पाहिजे. हा संदेश गेला पाहिजे. अशा गोष्टी अभ्यासक्रमात आणल्या पाहिजेत. चकचकीत जगणे विविध ठिकाणे, माध्यमातून बघतात तेच खरे जगणे असे वाटत असते. पण खरी वास्तविकता काय आहे हे त्या मुलांना आनंददायी शिक्षणातून कळावे अशी आशा आहे.

कष्टकऱ्यांच्या कष्टाचे मोल, मान, सन्मान किमान अशा कामाचा आदर करणे शिकावे. घरी येऊन पुस्तकात - वहीत लिहिणे याला अभ्यास न म्हणता, आज मला नवीन काही शिकायला मिळाले. जिज्ञासा कुतूहल स्वस्थ बसू देत नाही. मुल ऊर्जा खर्ची घालते. त्याची उत्सुकता, प्रश्नाची जिज्ञासा जागवतो, खत - पाणी घालून शिक्षक, शाळा, पालक वाढवतो. आनंददायी शिक्षणात हेच सहज शिक्षण आवश्यक आहे. मुलांना समजून घेणारे शाळा असेल तर मुले येतात, शिकतात, टिकतात, रमतात, समृद्ध होतात. दडपण न घेता आनंदाने करतात. मुलांना समजून घेणारे शिक्षण देण्याचा प्रयत्न करणार आहे.

आनंददायी शिक्षणाचा विचार करताना मातृभाषेतून संकल्पना स्पष्ट होणे आवश्यक आहे. जगण्यासाठी कौशल्य आवश्यक आहेच, त्या कौशल्यांचा विकास यातून व्हावा. शिक्षण मुलासाठी असावे, त्यात स्पर्धा, परीक्षा या मागे आंधळेपणाने धावून काहीच साध्य होणार नाही. जीवन व शिक्षण यातील तफावत या उपक्रमाने दूर व्हावी. "आनंददायी शिक्षण" ही चळवळ अधिक व्यापक होणे आवश्यक आहे. तरच मुले येतील, टिकतील, त्यांना गुणवत्तापूर्ण, निकोप शिक्षण मिळेल, मुले समृद्ध होतील आणि अशा वातावरणात घडलेली मुलेच देशाचे नाव उज्ज्वल करतील यात शंका नाही. शिक्षण हा प्रवास आहे स्पर्धा नाही हे यातून कळेल, तेव्हाच आनंददायी शिक्षणाचे महत्त्व व उद्देश सफल होईल.

(३) नवोपक्रमाची गरज व महत्व -

* नवोपक्रमाची गरज - माझी शाळा मनपा शाळा क्र.१७ सांगली येथील इयत्ता पहिली ते सातवी पर्यतचे विद्यार्थी संख्या - २०१ आहे. त्यांना वार्षिक नियोजनानुसार व नियमितपणे वर्गातील अध्यापनाचे विषय शिकविले जातात. तरीपण महाराष्ट शासनाच्या आनंददायी शिक्षण उपक्रमातुन अनेक उपक्रम राबविले गेले आहे. त्या उपक्रमांचा प्रभावी वापर करुन शाळा स्तरातील मुलांना आंनद घेता यावा म्हणून सांगली जिल्हा परिषद सांगलीने प्रत्येक शनिवारी "दप्तरा विना शाळा" हा उपक्रम राबविला जातो, त्याच दिवशी "शनिवार माझ्या आवडीचा.." या उपक्रमाचा विचार करण्यात आला. आपल्याला कोणीतरी मदत करेल या दृष्टीने सर्व मुलांना एकत्र करुन या उपक्रमातून नवीन काही तरी शिकायला मिळेल या भावनेतून हा उपक्रम मुलांच्यावर केंद्रीत करण्यात आला.

* महत्वाच्या बाबी -

१) मुलांचा सर्वागीण विकास साध्य करणे.

२) छोट्या - मोठ्या गटातील कृती मुलांच्या सोबत करणे.

३) मुलांना विविध विषयाचा, घटकाचा अभ्यास व कौशल्याचा विकास साधणे.

४) मुलांची जिज्ञासा, चिकित्सक वृती व प्रत्यक्ष कृती करण्याची प्रेरणा यांना वाव देणे.

५) उपक्रमासाठी साहित्य तयार करणे व त्याची हाताळणी करणे.

६) माती, बिया, पाने, फांदया, खडे, या सारख्या साहित्याचा वापर करणे.

७) कृतीला संधी देवून आवड निर्माण करणे.

८) शोध घेण्याची प्रक्रिया आत्मसात होण्यासाठी मुलांना मदत करणे.

९) मुलांना वैयक्तिक मार्गदर्शन व सराव करुन घेणे.

१०) प्रत्यक्ष परिणामकारकता पहाणे.

वरील महत्वाच्या बाबी विचार करुन तो सोडविण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला आहे, त्यामुळे माझे अनेक प्रश्न सोडविण्यास खूप मोठ्या प्रमाणात मदत झाली आहे. व मुलांच्या ज्ञानांत भर पडली आहे.

* नविनता - माझा हा नवोपक्रम माझ्या दृष्टीने इतराच्यापेक्षा पूर्णपणे वेगळा आहे. यामध्ये -

१) एकावेळी अनेक उपक्रम करण्याची संधी प्राप्त होते.

२) हा उपक्रम विद्यार्थी हसत खेळत पुर्ण करु शकतो,

३) मनावर कोणतेही दडपण येवू शकत नाही,

४) शिक्षकांच्या योग्य त्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करतात .

५) वेळेची बचत होऊन कृतीवर लक्ष केंद्रीत करता येते.

६) मुलांना मार्गदर्शन व भरपूर सराव करायला मिळतो.

७) योग्य वेळी वैयक्तिक लक्ष दिल्यामुळे कृती योग्य दिशेने होण्यास मदत होते.

८) विविध उपक्रमातील कृतीला योग्य संधीची जोड मिळते.

९) मुले कृती आवडीने आत्मसात करतात.

१०) मुले एकमेकांच्या संगतीने शिकत असल्यामुळे त्याना योग्य मार्गदर्शकाची गरज लागते.

११) अनेक उपक्रमात सहभागी होण्याची सर्वाना संधी मिळते.

१२) वर्गात आनंदी वातावरणाची निर्मिती होते.

* महत्त्व - माझ्या ह्या उपक्रमात कृतीला फार  महत्व आहे. कृती ही स्वःता आवडीने केल्यामुळे आनंदीमय वातावरण निर्माण होते. कृतीतून काम करण्याची निष्ठा मुलांच्या प्रती वाढीस लागते. सततच्या कृतीमुळे सहजपणे मुलांचे आरोग्य, शारीरिक समस्या, कृतीमधील हालचाल, घटकातील योग्य कृती करण्यासाठीची जबाबदारी आपणावर आहे व ती पूर्ण करण्यासाठी माझ्या ह्या नवोपक्रमामुळे बरीच मदत होते.

१) माझा हा नवोपक्रम शाळेतील प्रत्येक मुलांला व त्यांना मार्गदर्शन करणार्   या सर्व शिक्षकांना उपयोगी पडतो.

२) मुलांचा पाया पक्का होऊन प्रगती साधण्याच्या दृष्टीने माझ्या उपक्रमाचे महत्त्व अतिशय मोलाचे आहे.

३) मुलांच्या मनातील असणारी न्यूनगंडता दूर होण्यास मदत होते.

४) आपल्याला काहीतरी नवीन करता येईल, असा आत्मविश्वास प्राप्त होतो. व मुले त्या दृष्टीने प्रयत्न करतात.

५) सर्व मुले एकत्र आल्यामुळे "समायोजन शीलता" हे मूल्य वाढीस लागते, आणि लिंगभेद दूर होण्यास मदत होते.

६) आपल्या हातून शिक्षण कार्यात हवे तसे यश मिळते.

७) देशाची उज्ज्वल पिढी घडविल्या गेल्याचे आत्मिक समाधान मुलांच्याबरोबर शिक्षकाला ही मिळते.

८) कृतीवर लक्ष केंद्रीत केल्यामुळे यश प्राप्त होण्यास मदत होते.

९) सततच्या सरावामुळे कृती योग्य व परिपूर्ण होण्यास मदत होते.

१०) मनाला मिळालेले समाधान हे अतिशय वेगळे असते.

(४) नवोपक्रमाची उद्दिष्टे -

१) आनंददायी शिक्षण उपक्रमाची ओळख करुन देणे.

२) आनंददायी शिक्षण उपक्रमातील घटकांची/ उपक्रमाची नांवे सांगणे.

३) आनंददायी शिक्षण उपक्रमाची रचना व कार्य सांगणे.

४) आनंददायी शिक्षण उपक्रमाची प्रत्यक्ष ओळख करुन घेवून प्रत्यक्ष राबविलेल्या कृतीचे निरीक्षण व कार्यवाही करणे.

५) आनंददायी शिक्षणाची उपक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

(५) नवोपक्रमाची व्याप्ती व मर्यादा -

या नवोपक्रमातून मुले उपक्रमशील बनावित, त्यांना विविध घटकांची माहिती व्हावी. प्रत्यक्ष अनुभव घ्यावा आणि आत्मविश्वास वाढावा. कौशल्यांची ज्ञानात भर पडावी, मनात अभिरुची वाढावी, ज्ञानाबरोबर संवाद कौशल्य विकसित व्हावे, मनातील भिती दूर होवून, सर्व कामे करणे शक्य आहे असा आत्मविश्वास दृढ करणे हे नविन अभ्यासक्रमात पहायला मिळते. हेच आपण कृती व उपक्रमाच्या माध्यमातुन निश्चित केले आहे. हा उपक्रम इ. ६ वीच्या वर्गासाठी असुन तो मनपा शिक्षण विभाग सांगली, येथील केंद्र क्र.०५ सांगली. या केंद्रातील मनपा शाळा क्र.१७ सांगली या शाळेसाठीच मर्यादीत केला आहे. क्षेत्र व संख्या मर्यादित असून इ. ६ वी च्या वर्गापुरतेच अपेक्षित आहे. या सर्व मुलांच्यासाठी या उपक्रमाची व्याप्ती आहे.

* कालमर्यादा - माहे - ०१ जुलै - २०२३ ते ३० सप्टेंबर - २०२३ या तीन महिन्यापूरतीचे मर्यादीत आहे.

१) शाळा - मनपा शिक्षण विभाग, सांगली. केंद्र क्र.०५ सांगली. या केंद्रातील मनपा शाळा क्र १७ सांगली. (इ.१ ली ते ७ वी ची प्राथमिक शाळा)

२) विद्यार्थी - इ.१ ली ते ७ वी एकुण विद्यार्थी संख्या २०१.

३) शिक्षक - मनपा केंद्र क्र ०५ सांगली, या केंद्रातील मनपा. शाळा क्र. १७ सांगली. मधील शिकवणारे शिक्षक - एकुण - ०५ शिक्षक.

४) विषय साधनव्यक्ती / केंद्र समन्वयक - ०२

५) आयोजनाची वेळ - प्रत्येक शनिवारी ८:०० ते ११:०० शाळेच्या वेळेत, शाळेच्या आवारात, आणि शाळेतील शिक्षकांच्या सोबत, दप्तराविना शाळा ह्या उपक्रमाच्या माध्यमातून साध्य करता येईल.

अशा प्रकारे या नवोपक्रमाची संख्या, क्षेत्र आणि वेळेची व्याप्ती व मर्यादा आहे.

(६) नवोपक्रमाचे नियोजन - नवोपक्रम राबविणे निश्चित करताना या नवोपक्रमाविषयी मुलांना कोणती माहिती ज्ञात आहे, याबाबत चर्चा केली.

* शाळा स्तरावर उपक्रमाचे नियोजन व मार्गदर्शन -

* शाळा स्तरावर प्रत्यक्ष १४ आठवड्यामध्ये कामकाजाचे नियोजन व प्रत्यक्ष कार्यवाही - (माहे - ०१ जुलै - २०२३ ते ३० सप्टेबर - २०२३)

०१) पहिला शनिवार (०१ जुलै २०२३)

०२) दुसरा शनिवार (०८ जुलै २०२३)

०३) तिसरा शनिवार (१५ जुलै २०२३)

०४) चौथा शनिवार (२२ जुलै २०२३)

०५) पाचवा शनिवार (२९ जुलै २०२३)

०६) सहावा शनिवार (०५ ऑगस्ट २०२३)

०७) सातवा शनिवार (१२ ऑगस्ट २०२३)

०८) आठवा शनिवार (१९ ऑगस्ट २०२३)

०९) नववा शनिवार (२६ ऑगस्ट २०२३)

१०) दहावा शनिवार (०२ सप्टेंबर २०२३)

११) अकरावा शनिवार (०९ सप्टेंबर २०२३)

१२) बारावा शनिवार (१६ सप्टेंबर २०२३)

१३) तेरावा शनिवार (२३ सप्टेंबर २०२३)

१४) चौदावा शनिवार (३० सप्टेंबर २०२३)

१) पहिला शनिवार (०१ जुलै २०२३) - Paper Fish - कागदावर विविध आकाराची नक्षी काढून (पाणी, फुले, पतंग, मासा) यासारख्या कृतींना प्राध्यान्य देऊन तयार करण्यात आला. ही कृती पेपर फ्लॅश मध्ये दिसून येतो.

२) दुसरा शनिवार (०८ जुलै २०२३) - Hand Stitches - मुलांना अक्षर लेखनाची सवय व्हावी. सुंदर अक्षर यावे, म्हणून मुलांच्या विचारातून स्वतःचे नाव, एखादे अक्षर, एखादे वाक्य याबाबत लेखन करण्याची कल्पना मुलांना दिली त्याप्रमाणे कृती करण्यात आली.

३) तिसरा शनिवार (१५ जुलै २०२३) - Nature Drawing - निसर्गात काय असू शकतात, त्यानुसार कृतीत आणून चित्र काढण्याची संकल्पना मुलांना दिली. त्यानुसार मुलांनी चित्र काढले. त्यांच्यामध्ये कोणती कल्पना असु शकतात. याबद्दल कृती दिसुन आले. त्या पद्धतीनेच मुलांकडून या उपक्रमांचा सराव घेण्यास प्रेरित केले.

४) चौथा शनिवार (२२ जुलै २०२३) - Winter Snowman Collage - मुलांना विषय देऊन विषयाबद्दल वेगळी भूमिका तयार व्हावी. यासाठी "टाकाऊ पासून टिकाऊ" या संकल्पनेचा विचार करुन चिकटकाम (कोलाज चित्र) ही कृती तयार करण्यात आली.

५) पाचवा शनिवार (२९ जुलै २०२३) - 3D Drawing (Indian Map) - चित्रकलेतील एक वेगळी कौशल्य म्हणून आज थ्रीडी कृतीतून कशाप्रकारे नकाशा तयार करावा याबाबत प्रत्यक्ष कृती करून घेतली. ह्या कृतीसाठी प्रत्येकाने प्रयत्न केला.

६) सहावा शनिवार (०५ ऑगस्ट २०२३) - Making A Dairy (Small Dictionary) - मुलांच्याकडून स्वतःसाठी एक डायरी करण्याची कौशल्य त्यांना प्रथम समजावून दिले. त्याप्रमाणे प्रत्येकाची वेगळी डायरी तयार करण्यास संधी दिली.

७) सातवा शनिवार (१२ ऑगस्ट २०२३) - Model of India Map - १५ ऑगस्ट २०२३ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्त भारत देशाचा नकाशा स्वतःच्या कल्पनेतून व रंगसंगतीच्या माध्यमातून तयार करण्यात आला. प्रत्येकाला कृतीमध्ये वेगळे कौशल्य करण्यास संधी मिळाली.

८) आठवा शनिवार (१९ ऑगस्ट २०२३) - Nature Drawing - निसर्ग चित्राचा देखावा तयार करण्यास संधी देऊन तुम्हाला जे आवडेल ते चित्र रेखाटण्यास सांगितले व चित्र काढून घेतले. त्यातून प्रत्येकाचे कौशल्य नेमके काय आहे, हे मांडण्यात आले.

९) नववा शनिवार (२६ ऑगस्ट २०२३) - Making A Paper Apple - कागदापासून सफरचंद (Apple) बनवणे.  विविध कृतीद्वारे तयार करण्यात आले. कागद कामामध्ये विविध रंगसंगती व उठावदारपणा निर्माण करण्यात आला. हे एक शैक्षणिक साहित्य म्हणून वापर करण्यात आला.

१०) दहावा शनिवार (०२ सप्टेंबर २०२३) - Teachers Day Special Greeting Card - शिक्षक दिनाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून शिक्षकबद्दल असणारे प्रेम व्यक्त करण्यासाठी भेटकार्डाची सुरेख कल्पना विद्यार्थ्यांना दिली व त्यांच्या विचारातून नक्षीद्वारे तयार करण्यात आले. त्यामध्ये विविध आकारांची भेटकार्ड दिसून आली.

११) अकरावा शनिवार (०९ सप्टेंबर २०२३) - Hand Free Drawing - मुलांच्यामध्ये मुक्तचित्राचा वापर कसा करावा व ती कशी काढली जातात त्याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणून एका कला शिक्षकाला बोलवून मुलांना मार्गदर्शन केले. व मुलांना स्वतःच्या कल्पनेतून तयार करण्यास सांगितले. कोणी निसर्गचित्र, कोणी रात्रीचा प्रसंग, कोणी वृक्षांची महत्व, मानवी जीवन कसे आहे, विविध प्रसंगावर चित्रे काढण्यात आली.

१२) बारावा शनिवार (१६ सप्टेंबर २०२३) - Making A Wall Hanging - भिंतीवर लावण्यासाठी सुशोभित पॉकेट  तयार करण्यात आले. वापर कशासाठी केला जातो. त्यामध्ये पेन, लहान वही, विविध कार्ड, पेन्सिल, किल्ली, हे ठेवण्यासाठी विविध आकाराची फुले व नक्षीकाम करून भिंतीवर लावण्यात आली.

१३) तेरावा शनिवार (२३ सप्टेंबर २०२३) - Wall Hanging Craft - स्वतः मुलांच्या कडून विविध आकाराची मिळेल त्या कागदापासून कलाकुसर तयार करून भिंतीवर लावता येईल, असे डिझाइन कार्ड तयार करण्यात आले. त्यांची कृती कशी आहे, याबाबत प्रथम सर्वांना मार्गदर्शन केले.

१४) चौदावा शनिवार (३० सप्टेंबर २०२३) - Homan Right Poster Drawing - आज समाजात माहिती अधिकार हा विषय मोठ्या प्रमाणात आलेला आहे. या दृष्टिकोनातून मुलांच्या मनात भिती निर्माण होवू नये, म्हणून कशाप्रकारची माहिती आपल्याकडे घेता येते किंवा मागवता येते. त्यासाठी काय करावं व कोणत्या क्षेत्रात काय आहे याबाबतची चित्राच्या माध्यमातून माहिती संकलन तक्ता तयार करण्यात आला.

* महत्वाच्या बाबी/ उपक्रमावर चर्चा -

१) आपल्या पाल्याचे दैनंदिन निरीक्षण करून (मूल्यमापन) त्यामध्ये होणारा सकारात्मक बदल

पालकसभेत सांगणे व येणाऱ्या अडथळ्यांवरही चर्चा करणे.

२) मूल्यांकन - दिलेला घटक पालकांना दाखविणे व त्यावर चर्चा व मार्गदर्शन करणे. कोणत्या कृती परत कराव्या लागतील ते सांगणे.

३) विदयार्थ्यांनी केलेल्या कृतींचे फोटो, कार्डपेपर इत्यादी संचिकेमध्ये ठेवलेले असतात, ते दाखविणे. समाज सहभाग - उत्कृष्ट चित्रकार, गायक, शिक्षणप्रेमी, विदयार्थीप्रेमी, शाळाप्रेमी, व्यावसायिक इत्यादी लोकांना पालकांसमवेत बोलाविणे व त्यांचा उपयोग विदयार्थ्यांच्या शिकण्यात कसा होईल यावर चर्चा करावी.

४) मुलांसोबत सहभागी कसे करावे याविषयी पालकांना मार्गदर्शन करणे व त्याचे प्रात्यक्षिक करून दाखविणे. घरी मुलांसोबत कृती करण्यास प्रेरित करणे.

५) मुलांना भविष्यात उपयोगी पडेल अशा महत्वपुर्ण बाबीची माहिती या उपक्रमाच्या माध्यमातून देणे आवश्यक आहे. या बाबत विचारणा केली.

६) मुलां - मुलींच्या शंका व समाधान, समस्याचे निराकरण या नवोपक्रमातूनच करणे आवश्यक आहे.

७) मुलांना या उपक्रमातून विविध कृतीचे प्रत्यक्ष अनुभव देऊन जाणिवजागृती करण्यात आली.

८) मुलांना उपक्रमात जेथे अडचणी निर्माण झाल्या त्या ठिकाणी प्रत्यक्ष सहभाग घेवून मार्गदर्शन करण्यात आले.

निवडलेल्या विषयाबाबत तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शनाचे आयोजन करून अधिकाधिक माहिती देऊन भविष्यात कोणत्याही कामाकरिता दुसऱ्याची मदत लागणार नाही. याबाबत तज्ञ व्यक्तीशी चर्चा केली. मार्गदर्शनाचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यात आला. उपक्रमाच्या बाबीकरिता शाळेची पूर्वपरवानगी घेऊन उपक्रमाचे वेळापत्रक व वेळ निश्चित केली. यामुळे अभ्यासावर कोणत्याही प्रकारचा परिणाम होणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात आली. दप्तराविना शाळा व आनंददायी शिक्षण या उपक्रमाचा सदउपयोग करण्यात आला.

* नवोपक्रम कार्यवाहीचे वेळेचे अंदाज पत्रक -

१) नवोपक्रम विषयावर चर्चा - (एक दिवस)

२) नवोपक्रमातील साहित्य तयारी - (एक आठवडा)

३) नवोपक्रमावर पूर्वज्ञानावर आधारीत कार्यक्रम - (दोन दिवस)

४) विषयतज्ञांचे मार्गदर्शन - (दोन दिवस)

५) नवोपक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही - (दोन महिने)

६) नवोपक्रमातील भेटी दिलेल्या ठिकाणाची चर्चा - (एक आठवडा)

७) शाळा स्तरावर सभाचे आयोजन करणे - (तीन दिवस)

८) नवोपक्रमाची अंतिम तयारी - (एक दिवस)

९) नवोपक्रमाचे अहवाल तयार करुन लेखन कार्य - (एक आठवडा)

(७) नवोपक्रमाची कार्यपद्धती -

मुलांना नवनवीन माहिती व अनुभव प्रत्यक्ष कामातून मिळावा म्हणून मुलांना उपक्रमातून तो प्रत्यक्ष अनुभव घेऊन त्यांचा आत्मविश्वास वाढावा. ज्ञान, कौशल्य, आकलन शक्ती, कल्पनाशक्ती आणि अभिव्यक्तीचा विकसित व्हावी या गोष्टीचे महत्त्व लक्षात घेऊन माहे - ०१ जुलै - २०२३ ते ३० सप्टेंबर - २०२३ या तीन महिन्यात १४ आठवड्यामध्ये शाळा स्तरावरचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले. राबविण्यात आलेले नियमित उपक्रमामध्ये कृतींचे योग्य पध्दतीने नियोजन व कार्यवाही बाबत मार्गदर्शन करुन कृतींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी उपक्रमांधारित अध्यापन शास्त्राचा वापर करण्यात आला. नियमित उपक्रमाबाबतची कृती करण्यात आली. वरीलप्रमाणे नियोजनानुसार उपक्रमाचे कामकाज निश्चित केले. शाळेला भेटी देवुन कौशल्य विकास कसा साध्य करता येईल याबाबत विचार विनिमय झाला. प्रत्यक्ष चर्चा करुन कामकाज करण्यात आले.

* तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन -

१) श्रीम.धनश्री कांबळे - विषय साधनव्यक्ती/ केंद्र समन्वयक, मनपा शिक्षण विभाग सांगली.

अभ्यासाबरोबर अवांतर ज्ञान मिळणे फार गरजेचे आहे. या उपक्रमातुन तुम्ही चांगल्याप्रकारे माहिती मिळविता आली. मुलांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. माहिती संकलन, मार्गदर्शन सहभाग, विविध नोंदी प्रक्रिया करण्याची संधी प्राप्त झाली, यामध्ये मुलांच्या सोबत सहकारी शिक्षक ही सहभागी झाले. उपक्रम व कृती ही मुलांची आवडती बाब आहे.

व्यक्तीचा विकास कृतीवर अंवलबुन असतो. कष्ट करण्याची इच्छा असुन ही तसे करता येत नाही. अनेक अडचणीना तोंड द्यावे लागते. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यश प्राप्त होते. हे प्रत्यक्ष अनुभवातून सिध्द केले. विविध कृती व उपक्रमातुन यश मिळविण्याची संधी प्राप्त झाली. आत्मिक समाधान मिळाले.

२) श्री.भारत बंडगर - विषय साधनव्यक्ती / केंद्र समन्वयक मनपा शिक्षण विभाग सांगली.

मुलाचे सदैव आपले ध्येय निश्चित करुन अभ्यासावर लक्ष केंद्रीत केल्यास यश निश्चित मिळते. स्पर्धेच्या जगात बौध्दिक विकास साधण्यासाठी बाह्य ज्ञानाची खूप गरज आहे. त्याचा अनुभव प्रत्यक्ष यावा म्हणून वेगवेगळ्या बाबीचा अंर्तभाव केला. उपक्रम म्हटले की, मुले आनंदी होत असतात. म्हणून मुलांना त्या आनंदात सहभागी करुन घेण्यात आले.

मुलांना उपक्रमाचे वेळापत्रक सांगून यामध्ये नैसर्गिक अथवा कृत्रिम कारणाने काही बदल होऊ शकतात. अशा प्रकारच्या सूचना ही शाळा स्तरावर देण्यात आल्या. या उपक्रमाअंतर्गत राबविलेले कार्यक्रम व मार्गदर्शक सुचनाचा विचार करुन मुलांना योग्य त्या उपक्रमात निश्चित ठिकाणी भेटी दिल्या. झालेल्या भेटीतील चर्चेचा विचार करण्यात आला. मुलांनी प्रत्येक बाबीच्या महत्त्वाच्या नोंदी, कृतीची माहिती, वेगवेगळ्या कृती, अनुभव, कृतीची नियमावली, भेटीचा कार्यक्रम संपल्यानंतर मुलांच्यामध्ये ज्ञान प्राप्त होण्यासाठी काही महत्वाच्या नोंदी व्हायला पाहिजे. शिक्षकांनी मुलांच्या विस्तृत नोंदी घेतल्या. उपक्रमानंतर मोठ्या प्रमाणत मुलांच्यामध्ये बदल झालेला दिसुन आला.

शाळा स्तरावर पालक भेटीच्या व माता - पालक सभाच्या माध्यमातून कृती व उपक्रमातून कशाप्रकारे मुलांच्यात बदल झाला याबाबत चर्चा करण्यात आली. ज्या उपक्रमात पालक स्वतः सहभागी झालेले होते, त्यांनी उपक्रमातील झालेल्या बाबीचा आढावा सादर करण्यात आला.

* उपक्रमाचे मुल्यमापन व नोंदी -

अ) अध्ययन अनुभवातून आनंद -

१) स्वतः प्रति उच्चप्रतीची जागृती निर्माण होते, त्याकडे लक्ष देण्याची क्षमता विकसित होते.

२) विषय व कृती लक्षपूर्वक समजून घेतात.

३) अध्ययनातील उपक्रमाचे अधिक चांगली मांडणी केली आहे.

४) अध्ययनाच्या रुचीमध्ये वाढ होते. हे लक्ष्यात येते.

५) प्रत्यक्ष केलेल्या कृतीचा विकास होतो.

६) वर्तमानातील कृती वर लक्ष केंद्रित होते. दुर्लक्ष होणे कमी होते.

उदा. शिक्षण, कार्य, खेळ, कला, कृती यामध्ये एकाग्रता वाढते.

७) वर्तमानात कसे शिकले पाहिजे, म्हणजे स्वतःमधील आणि आजूबाजूला घडणाऱ्या बदलांची जाणीवपूर्वक दखल घेतली जाते.

ब) चिंतन विकास -

१) स्वतःला आणि इतरांना समजून घेता येते. २) दुसऱ्याचे विचार आणि कृती समजून घेण्याची योग्यता निर्माण करण्याची क्षमता विकसित होते.

३) समाधान केंद्रित होतात.

४) उत्कृष्टता निवडतात.

५) पारंपारिक व रूढीप्रिय विचारातून बाहेर पडतात.

६) सृजनात्मक कार्यात वाढ होते.

क) सामाजिक आणि भावनिक विकास -

१) आत्मियतेचा विकास होतो, दुसऱ्याची स्थिती समजून स्वतःला त्या स्थितीत पाहून योग्य ती प्रतिक्रिया दिली जाते.

२) परस्पर संबंधात एकमेकांच्या अपेक्षा समजून घेता येतात.

३) तणाव आणि अस्वस्थता यातून बाहेर पडण्यासाठी सक्षम होतात.

४) कठीण परिस्थितीत लक्षपूर्वक समजून घेऊन योग्य निर्णय घेऊ शकतो.

५) परस्पर संबंध जाणून घेऊन वादविवादाच्या परिस्थितीत योग्य समाधान प्राप्त होते.

६) उत्तम संप्रेषण म्हणजे संवाद आणि व्यक्त होण्याचे अभिव्यक्ती कौशल्य विकसित होते.

(८) नवोपक्रमाची यशस्विता -

"शनिवार माझ्या आवडीचा..," या नवोपक्रमातून आपणास काय शिकायला मिळाले. व नावीन्यपूर्ण बाबी कोणत्या आहेत. त्या प्रत्यक्ष पहाता आल्या.

०१) उपक्रमातून निरीक्षण कौशल्यांचा योग्य पध्दतीने विकास साधता आला.

०२) एकमेकाशी कृती करुन झालेल्या कृतीविषयी माहिती मिळाली.

०३) सर्व उपक्रम वयोगटाला साजेसे असल्यामुळे एकमेकाशी जवळीकता साधता आली.

०४) मानवी परिस्थितीत झालेल्या कृतीतील बदल जुळवून घेण्याविषयी उपक्रमातून शिकायला मिळाले.

०५) वेगवेगळ्या बाबीतील कृतीशील घटकाचा उपयोग करुन याबाबत चर्चा करता आली.

०६) कोणत्या कृतीला प्रथम प्राधान्य द्यावे, याबद्दलानुसार वेगवेगळ्या कृतीची कारणे जाणून घेता आली.

०७) उपक्रमातील कृती करताना शरीराचा समतोल कसा स्थिर ठेवावा यांची माहिती मिळाली.

०८) उपक्रमातील कृती करताना कोणत्या गोष्टीना महत्व द्यावे, याचे ज्ञान प्राप्त झाले.

०९) उपक्रमातील कृतीची सखोल माहिती मिळाली. व मुलांना आनंद घेता आला.

१०) या उपक्रमामुळे पट वाढीला व उपस्थितीला प्रत्यक्ष चालना मिळाली.

* नावीन्यपूर्ण बाबी -

०१) सभोवतालच्या परिस्थितीतील वस्तूंचा साहित्य म्हणून वापर करण्यात आला.

०२) मुलांना वाचन, भाषण आणि संभाषण या कौशल्यासाठी प्रेरित झालेली दिसून आली.

०३) मुलांची जिज्ञासा, चिकित्सकवृत्ती, कृती करण्याची प्रेरणा या क्षमतांना वाव मिळाला.

०४) योग्य त्या कृती करण्यास वापरलेल्या साहित्याचा पुरेपूर वापर केला गेला.

०५) मैत्रीपूर्ण नाती तयार होण्यास संधी मिळाली.

०६) प्रत्येक मुलास कौशल्ये प्राप्त होण्यास मदत झाली.

०७) दिव्यांग मुलांना "मदतीचा हात" या उपक्रमातून संधी मिळाली.

०८) आत्मविश्वास निर्माण होण्यास ह्या उपक्रम संधी मिळाली.

०९) कृतीमध्ये सर्व मुले सहभागी झाल्याने, कृती करण्यास गती मिळाली.

१०) मुलांच्या विकासास संधी व शिकण्याची प्रक्रिया समजावून घेता आली.

११) वैयक्तिक कृती करण्याकडे प्रत्येक मुलांचा कल दिसुन आला.

१२) मुलांना या उपक्रमातून वेगवेगळे अनुभव अनुभवता आले.

१३) प्रत्येक मुलाला स्वत:शी तुलना करण्याची संधी मिळाली.

१४) कृतीच्या निरीक्षणातून मुलांची प्रगती कशी आहे, याची जाणिव झाली.

१५) मुलांच्या कृतीचे मूल्यमापन हे त्या  मुलांच्या कृतीतील सहभागातून दिसून आले.

१६) प्रत्येक कृतीत मुले आनंदी दिसून आली.

१७) मूल्यमापनाच्या नोंदीत मुले प्रगतीपथावर दिसून आली.

(०९) संदर्भसुची व परिशिष्टे -

* संदर्भसूची -


०१) गाडगीळ स्वाती, कृती संशोधन व नवोपक्रम (नोव्हेंबर २००६) सुविचार प्रकाशन पुणे.

०२) ज्ञानरचनावाद ओळख, शिक्षण संक्रमण (मार्च २०१०) म.रा.मा.व उ.मा. शिक्षण मंडळ पुणे.

०३) उपक्रमामुळे शाळेची ओळख, जीवन शिक्षण (जुलै २०१७) महाराष्ट्र राज्य विद्या प्राधिकरण पुणे.

०४) सांगली जिल्हा परिषद सांगली आनंददायी उपक्रम कार्यक्रम रुपरेषा - २०२२.

०५) सांगली जिल्हा परिषद सांगली आनंददायी उपक्रम Happiness Programme अंमलबजावणी २०२२.


* परिशिष्टे-

१) केंद्राचे नाव - मनपा केंद्र क्र. ०५ सांगली.

२) शाळाचे नांव - मनपा शाळा क्र.१७ सांगली.

३) शाळेतील एकुण शिक्षक संख्या - ०५

४) शाळेतील एकुण विद्यार्थी संख्या - २०१

५) उपक्रमात सहभागी विद्यार्थी संख्या - २१

६) केंद्र समन्वयकांचे नांव -

१. श्रीम.धनश्री तुकाराम कांबळे. केंद्र क्र.०५ सांगली. मनपा.शिक्षण विभाग सांगली.

२. श्री. भारत चिंतामणी बंडगर. केंद्र क्र.०६ सांगली. मनपा.शिक्षण विभाग सांगली.

७) सहभागी शिक्षकांची नांवे - मनपा शाळा क्र.१७ सांगली.

०१. अय्युब न. पटेल. (मुख्याध्यापक)

०२. हमिदा मु. इंडिकर.

०३. सुमय्या सि. मुजावर.

०४. शे.सलीम श. मुस्तफा.

०५. समिना र. नालबंद.

८) उपक्रमात सहभागी विद्यार्थी नांवे -

०१) यासर अरीफ नदाफ (६ वी)

०२) साद इलिहास सय्यद (६ वी)

०३) अफ्फान खलील पाथरवट (६ वी)

०४) मो.यासीर निसार असारी (६ वी)

०५) परवेज असलम नदाफ (६ वी)

०६) अदनान राजा तांबोळी (६ वी)

०७) हसनेन इस्माईल शेख (६ वी)

०८) फैजल राजाज शेख (६ वी)

०९) अनमोल नासीर पाथरवट (६ वी)

१०) सुफीया रफीक जमादार (६ वी)

११) तसमिया असिफ मुलाणी (६ वी)

१२) नुरेन जहीर अब्बास शिरसाठ (६ वी)

१३) जन्नत मेहबूब नदाफ (६ वी)

१४) तंजिला उमराज कनवाडे (६ वी)

१५) सफा यासीन पाथरवट (६ वी)

१६) हनिफा फय्याज पाथरवट (६ वी)

१७) समिया समीर बारगीर (६ वी)

१८) जिक्रा युनुस पाथरवट (६ वी)

१९) जोया इरफान सय्यद (६ वी)

२०) अनिसा जोहेब चौगुले (६ वी)

२१) सफा शोयब शिलेदार (६ वी)